दि. 16/03/2023

लोकमत पू. पान क्र. 1

# बालमित्राकडून घेतली ४८ लाखांची खंडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : दुचाकीला झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याने गुन्हा दाखल होण्याची भीती घालून बालपणीच्या मित्राने पाच कोटींची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. त्यापैकी ४८ लाख रुपये उकळणाऱ्या खंडणीखोर मित्राला काशिमीरा पोलिसांनी नांदेडमधून अटक केली आहे. प्रशांत सवणेकर असे आरोपीचे नाव आहे.

काशिमीरा येथे राहणारे सत्यप्रकाश पुरुषोत्तम आर्य (३९) हे पुण्यात बँक ऑफ न्यूयॉर्क मेलनमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करतात. डिसेंबर २०२२मध्ये ते कुटुंबासह गुजरातच्या जुनागढ भागात देवदर्शनासाठी गेले होते. तेथे त्यांच्या मोटारीने एका दुचाकीला दिलेल्या धडकेत चालक खाली पडला. त्यानंतर तो निघून गेल्याचे सत्यप्रकाश यांनी गाडीच्या आरशातून पाहिले होते. सत्यप्रकाश यांनी हा प्रकार त्यांचा बालपणीचा परभणीतील पूर्णा गावचा मित्र प्रशांत सवणेकर (३९) याला सांगितला. मात्र, प्रशांत याने तो दुचाकीस्वार कोमात आहे, त्याचा मृत्यू झाला आहे, अशी कारणे सांगून सर्वांना गप्प करण्यासाठी 'पाच कोटींची' मागणी केली. तसेच आपल्याकडील चार कोटी खर्च केल्याचे सांगून सत्यप्रकाश यांच्याकडून ४८ लाख रुपये उकळले. उर्वरित साडेचार कोटींसाठी तगादा लावला. एवढे पैसे देणे शक्य नसल्याचे सांगताच त्याने सत्यप्रकाश यांना मारण्याची धमकी दिली. अखेर, काशिमीरा पोलिसांत फिर्याद दिल्यावर उपायुक्त जयंत बजबळे व सहायक पोलिस आयुक्त विलास सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप कदम, उपनिरीक्षक निखिल चव्हाण, जयप्रकाश जाधव व उपायुक्त कार्यालयातील पोलिसांनी तपास सुरू केला. माहितीच्या आधारे पोलिस पथकाने आरोपी प्रशांत याला नांदेड येथून १३ मार्चला अटक केली.

सकाळ पान क्र. 4

# 'पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी'

गेल्या तीन महिन्यांत राज्यात ३० हून अधिक हल्ले पोलिसांवर झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पोलिसांवर हल्ल्याची प्रवृत्ती बळावू नये म्हणून असे गुन्हे करणाऱ्यांवर न्यायालयात त्वरित दोषारोपपत्र दाखल करण्याची मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी बुधवारी विधानसभेत केली.

"राज्यातील नागरिकांच्या संरक्षणासाठी पोलिस २४ तास कार्यरत असतात. अनेकवेळा जिवाची पर्वा न करता ते आपले कर्तव्य बजावतात. मात्र कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावरच हल्ले होत आहेत. असे हल्ले करणाऱ्यांवर सरकारने जरब बसवावी," अशी मागणी पवार यांनी केली. पोलिसांवर हल्ला झाल्याच्या जवळपास तीसहून अधिक घटना मागील तीन महिन्यात घडल्या आहेत. अंगावर थेट गाडी चढवणे, गाडीसोबत फरफटत नेणे, पोलिसांच्या अंगावर धावून जाणे अशा घटनांत वाढ झालेली आहे. नागरिकांच्या संरक्षणासाठी २४ तास कार्यरत असणाऱ्या पोलिसांनाही संरक्षण, संपर्कासाठी वॉकी टॉकी, मोटारसायकल आदी गोष्टी पुरविण्याची आवश्यकता आहे.

पोलिसांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी आणि असे हल्ले होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना करण्याची अजित पवार यांनी केली.

CS CamScanner


Scanned with CamScanner

लोकसत्ता पू.पान क्र.1 दि. 16/03/2023

# जलद प्रवासासाठी तीन नवे खाडीपूल

## वसई-मुंबईचे अंतर गतिमान करण्यासाठी वैतरणा, भाईंदर खाडीजवळ पूल उभारणार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**वसई :** पालघर तसेच वसई विरार शहरातून मुंबईला जलदगतीने जाता यावे यासाठी वैतरणा तसेच आणि भाईंदर खाडीजवळ तीन नवीन पूल उभारण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. या मागणीसाठी वसईच्या आमदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले.

पालघर हा मुंबईला लागून असलेला जिल्हा आहे. दररोज लाखो लोक नोकरी आणि व्यवसायानिमित्त मुंबईला ये-जा करत असतात. मात्र पुरेशा दळणवळणाच्या सोयी सुविधांअभावी मुंबईला वळसा घालून जावे लागते. त्यामुळे वेळ आणि इंधन खर्च होते. भाईंदर खाडीवर पूल मागील २२ वर्षांपासून रखडलेला आहे. याशिवाय वसई विरार शहरातील अनेक प्रकल्प मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

यासंदर्भात वसईच्या आमदारांच्या शिष्टमंडळांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शहरातील परिस्थिती निदर्शनास आणून दिली. या बैठकीला नालासोपाऱ्याचे आमदार क्षितिज ठाकूर, बोईसरचे आमदार राजेश पाटील, मुख्यमंत्री कार्यालयाचे महासंचालक राधेश्याम मोपलवार आणि अतिरिक्त सचिव भूषण गगराणी उपस्थित होते.

भाईंदर खाडीवरून प्रस्तावित पुलाच्या कामातील मंजुरीचे अडथळे पूर्ण करून ते काम सुरू करण्याची विनंती करण्यात आली. याशिवाय वैतरणा खाडीवर पूल उभारणे, भाईंदर आणि नायगाव दरम्यान मेट्रो रेल्वेच्या बाजूला अतिरिक्त खाडी पूल आणि वर्सोवा-विरार-पालघर सागरी पूल उभारण्याची मागणी करण्यात आली. या तीन महत्त्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीमुळे प्रवाशांना विनाअडथळा वाहतुकीचा अनुभव मिळण्यास मदत होणार आहे तसेच आदिवासी, शेतकरी आणि मच्छीमार बांधवांच्या परिसराची प्रगती होण्यास मदत होणार आहे, असे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले.

या बैठकीत वसई आणि पालघरमधील रखडलेल्या प्रकल्पाबाबत चर्चा करून ते पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. शहरात ७ नवीन रस्ते प्रकल्प प्रस्तावित असून १२ नवीन उड्डाणपूल प्रस्तावित आहेत. त्यांची कामे देखील लवकर मार्गी लावण्याची मागणी आमदार क्षितिज ठाकूर यांनी केली.

या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड (एमएमबी) आणि महारेल या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित संस्थांना उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

### वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठी १२ उड्डाणपूल

वसई, विरार शहरातील अंतर्गत वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी रखडलेल्या १२ उड्डाणपुलांचे काम तातडीने सुरू करण्याचे आदेशही शिंदे यांनी दिले आहेत. मनोर-वाडा-आसनगाव या भागांना मुंबई-नाशिक समृद्धी महामार्गाला जोडणे, रेल्वे उड्डाणपूल, पूर्व-पश्चिम जोडणारे पूल आणि उड्डाणपूल बांधण्यासाठी आर्थिक मदत देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

# ठाणे-वसई दरम्यान जलवाहतुकीतील अडथळा दूर

## प्रकल्पास मान्यता, अर्थसंकल्पात ४२४ कोटींची तरतूद

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्र सागरी मंडळाने ठाणे खाडी, वसई खाडी आणि उल्हास नदी एकमेकांना जोडून मुंबई, वसई, ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई अशी वर्तुळाकार जलवाहतूक सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ४२४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रस्तावास मंजुरी मिळाल्याने आवश्यक त्या परवानग्या घेऊन प्रकल्प मार्गी लावण्यात येणार आहे.

### प्रवास अतिजलद

**ठाणे मीठ बंदर आणि कशेळीदरम्यानचा खडक फोडून जलमार्गातील अडथळा दूर करण्यात येणार आहे. हा अडथळा दूर झाल्यानंतर मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील अनेक ठिकाणे जलवाहतुकीने जोडून प्रवास अतिजलद करण्यात येणार आहे. भविष्यात दक्षिण मुंबई - कल्याण, ठाणे - वाशी, बेलापूर, ठाणे - कल्याण, डोंबिवली, ठाणे - वसई खाडी अशी जलवाहतूक सुरू करण्यात येणार आहे.**

सागरी मंडळाने 'सागरमाला' योजनेअंतर्गत वसई - ठाणे - कल्याण असा ५० किमी लांबीचा जलमार्ग विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाअंतर्गत १० जेट्टी बांधण्यात येणार असून या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात चार जेट्टींची कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्याचबरोबर मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील इतर ठिकाणेही जलमार्गाने जोडण्याचा निर्णय सागरी मंडळाने घेतला आहे. त्यासाठीचे नियोजन सुरू आहे.

या प्रकल्पाला राज्य सरकारने मंजुरी दिली असून यासाठी अर्थसंकल्पात ४२४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची घोषणा केली.

मार्गात अडथळा ठरणारा खडक फोडण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्यात येणार आहेत. यासाठी पर्यावरणासंबंधीची परवानगी अत्यंत महत्त्वाची आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या परवानग्या मिळाल्यानंतर खडकाचा प्रकार लक्षात घेऊन तो फोडण्यासाठी आवश्यक त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. प्रत्यक्षात हे काम सुरू होण्यास एक वर्षाचा कालावधी लागेल, असे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. हे काम पूर्ण झाल्यास ठाणे, वसई खाडी, तसेच उल्हास नदी एकमेकांशी जोडली जाईल आणि जलमार्गाचा मार्ग मोकळा होईल, असे या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकसत्ता पृ.पान क्र.1

दि. 16/03/2023

# चिंचोटी-भिवंडी रस्त्याची दुर्दशा कायम

## नागरिक पुन्हा आंदोलनाच्या तयारीत

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** चिंचोटी कामण- भिवंडी या रस्त्याची अजूनही दुरुस्ती करण्यात आली नाही. रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे व धुळीच्या साम्राज्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून पुन्हा एकदा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

वसई पूर्वेच्या भागातून चिंचोटी-कामण भिवंडी महामार्ग गेला आहे. या महामार्गावरून दररोज मोठ्या संख्येने वाहनांची ये-जा सुरू असते. या रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमुळे बसत असलेल्या हादऱ्यामुळे वाहनांचे तर नुकसान होतेच, परंतु कंबर व मणक्याचे दुखणे आता प्रवाशांना सहन करावे लागत आहे. रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी सातत्याने केली जाते. त्यावर फक्त आश्वासन देऊन तात्पुरती मलमपट्टी केली जाते.

पावसाळ्यात या मार्गावर सर्वाधिक खड्डे होते. त्या वेळी पावसाचे कारण पुढे करत दुरुस्ती करताना अडचणी येत असल्याचे सांगण्यात आले होते. पावसाळा सरला व आता दुसरा पावसाळा येईल तरीही या खड्डेमय रस्त्याची दुरुस्ती झाली नसल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. आता पुन्हा एकदा या रस्त्याच्या संदर्भात आंदोलन करण्याच्या तयारीला ग्रामस्थ लागले आहेत. या वेळी गावनिहाय बैठका घेऊन आंदोलन दिशा ठरवून रास्ता रोको केला जाणार असल्याचे नागरिकांमधून सांगण्यात येत आहे.



**धुळीने नागरिक त्रस्त**

रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांशिवाय आता उडणाऱ्या धुळीच्या वाढत्या प्रदूषणाने नागरिक त्रस्त आहेत. वाढत्या धूलिकणांमुळे येथून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. धूलिकण नाकातोंडात जात असल्यामुळे श्वसनाच्या आजाराला त्यांना सामोरे जावे लागत आहे.

> रस्त्याबाबत वारंवार आंदोलन व पत्रव्यवहार करून यावर प्रशासन लक्ष देत नाही. या प्रशासनाला जागे करण्यासाठी पुन्हा एकदा आंदोलन छेडले जाणार आहे. — ॲड. दिनेश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते

म.टा. पान क्र.5

# सीसीटीव्हीचे नवे जाळे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## मुंबईसह पुणे, पिंपरी-चिंचवडसाठी प्रकल्प



मुंबईसह राज्यातील इतर शहरांची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी येत्या काळात सीसीटीव्ही आणि सीसीटीएनएस प्रकल्पाचा दुसरा टप्पा लवकरच कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधानसभेत दिली. त्यानुसार मुंबईत आणखी ५८३७, पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथे १४०६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली. यावेळी फडणवीस म्हणाले, 'मुंबईत सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यामुळे गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण वाढले आहे. लवकरच याचा दुसरा टप्पाही कार्यान्वित करण्यात येईल. याचे काम लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीला देण्यात आले आहे. या अंतर्गत चेहरा ओळख (फेस रेकग्निशन) सुविधा असणारे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात येतील', असे त्यांनी जाहीर केले. 'पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्येही १४०६ कॅमेरे बसवण्यात येणार असून, दोन्ही शहरांत सुरक्षिततेच्या दृष्टीने गुणात्मक बदल होईल. बारामती व माळेगावमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची मागणी अजित पवार यांनी केली होती, त्यास मान्यता दिली आहे. सीसीटीएनएस प्रकल्प राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. सर्व पोलिस ठाणी या माध्यमातून जोडण्यात येत आहेत. त्यानुसार सर्व अभिलेखांचे डिजिटायजेशन झाले आहे', असेही फडणवीस यांनी जाहीर केले. 'एम्बिस प्रणाली राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. गुन्हेगारांचे बायोमेट्रिक रेकॉर्ड ठेवणारी ही पद्धत आता केंद्रही राबविणार आहे. गुन्हेगारांचे बायोमेट्रिक रेकॉर्ड यात ठेवण्यात येईल. एखाद्या गुन्हेगाराने देशात कुठेही गुन्हा केला व तो पकडला गेल्यानंतर त्याचा सर्व गुन्हे पूर्वेतिहास क्षणार्धात समोर येईल', असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 16/03/2023

पुण्यनगरी पृ. पान क्र. 4

# खोट्या सह्या करून सातबारावर नावे लावणाऱ्या तलाठ्यासह दोघांवर गुन्हा

**मीरा रोड** । भाईंदर पश्चिमेच्या मौजे भाईंदर येथील जमिनीची कागदपत्र बनवून खोट्या सह्या करून सातबाऱ्यावर मूळ मालकाचे नाव काढून दुसऱ्याचे नाव लावण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात तत्कालीन तलाठी व इतर दोन विकासक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिम, मुर्धा गाव येथे नयना पाटील या राहत असून त्यांची व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांची मौजे भाईंदर येथे सामायिक मालकीच्या जमीन आहे. त्यांच्या मालकीच्या पाच सर्वे नंबरमधील जमिनी या १९९४ रोजी डेव्हलमेंट ॲग्रीमेंट व पॉवर ऑफ ॲटर्नी करून नरेश जैन, शैलेश शहा यांना डेव्हलप करण्यासाठी दिलेल्या होत्या. त्यांनी केलेल्या कराराप्रमाणे मुदतीत मोबदला दिला नाही. त्यामुळे त्यांच्याबरोबर झालेले सर्व करारनामे २०११ मध्ये रद्द करण्यात आले. त्यानंतर पाटील कुटुंबीयांची २०२२ मध्ये आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे पाटील यांनी त्यांच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या जमीन विक्री करण्याचे ठरवले. त्यावेळी त्यांनी त्यांच्या जमिनीचे सातबारा काढले असता त्यावर श्यामसुंदर राधेश्याम अग्रवाल व मुरलीधर राधेश्याम अग्रवाल यांची नावे असल्याचे दिसून आले. त्यावेळी त्यांनी जमिनीचे फेरफार व इतर कागदपत्र माहिती अधिकारामध्ये काढली. त्यामध्ये मौजे भाईंदर जुने सर्वे नंबर ५५८ नवीन सर्वे नंबर २०८/१ , जुना ५५८/५ नवीन २०८/५ ही जमीन नरेश जैन, शैलेश शहा यांच्याकडून मोरारजी छेडा, दिनेश छेडा यांना व त्यांच्याकडून २००८ मध्ये नोंदणी करून श्यामसुंदर राधेश्याम अग्रवाल, मुरलीधर राधेश्याम अग्रवाल यांना विक्री केली.

त्या दस्ताच्या आधारे श्यामसुंदर राधेश्याम अग्रवाल, मुरलीधर राधेश्याम अग्रवाल यांनी तलाठी यांना सातबाऱ्यावर नाव लावण्यासाठी अर्ज करून तलाठी भाईंदर यांच्याशी संगनमत करून, तलाठी भाईंदर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये पाटील कुटुंबीयांना २००८ मध्ये नोटिसा काढल्या असून त्या नोटिसांवर १९९५ मध्ये मृत असलेल्या तुकाराम हरी पाटील यांच्या व त्यांच्या कुटुंबातील इतरांच्या बनावट सह्या करून, सातबाऱ्यावर नाव लावण्यासाठी त्याचा उपयोग करून पाटील कुटुंबाची फसवणूक केल्यामुळे श्यामसुंदर राधेश्याम अग्रवाल, मुरलीधर राधेश्याम अग्रवाल, तत्कालीन तलाठी भाईंदर व्ही. बी. पवार यांच्याविरुद्ध भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धार्मिक भावना भडकावणाऱ्यांविरोधात काँग्रेसची कारवाईची मागणी

**मीरा रोड** । मीरा-भाईंदर शहरात एका विशिष्ट समाजाच्या वतीने जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात उपस्थित वक्त्यांनी धार्मिक भावना भडकवणारी आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याने शहरातील वातावरण बिघडू शकते. आगामी काळात अशा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या संघटनांच्या आयोजनावर कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने कडक निर्बंध घालावेत, यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्याशी सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आल्याचे जिल्हा प्रवक्ता प्रकाश नागणे यांनी सांगितले. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्यासह माजी नगरसेवक जुबेर इनामदार, अश्रफ शेख, मर्लिन डिसा, गीता परदेशी, रुबिना शेख आदी उपस्थित होते. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार दिला असला तरी कोणत्याही इतर धर्माबद्दल चिथावणीखोर, प्रक्षोभक भाषा वापरून समाजामध्ये तेढ निर्माण होईल, अशी वक्तव्ये करण्याचा अधिकार दिलेला नाही. आपला देश धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखला जात असताना विशिष्ट धर्माचा प्रचार आणि प्रसार करताना इतर धर्माबद्दल आक्षेपार्ह विधान करणे चुकीचे आहे, असे नागणे म्हणाले, आगामी काळात शहरात विविध धर्मीयांचे सण-उत्सव साजरे होणार आहेत, कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी पोलीस प्रशासनाने घ्यावी यासाठी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 16/03/2023

पुण्यनगरी मु. पान क्र. 1

# वसई-विरारच्या समस्या सोडवण्यासाठी आ. ठाकूरांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

## मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

**वसई :** वसई-विरारसह पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच मतदारसंघातील समस्यांसाठी बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर तसेच आमदार क्षितिज ठाकूर, आमदार राजेश पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आणि त्या सोडविण्यासाठी साकडे घातले. मागील निवडणुकीत झालेल्या कटुतेबाबत भर सभागृहात यापुढे तुम्हाला तक्रारीला वाव मिळणार नाही, असे आश्वासन दिले.

मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत शहराला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची जोडणी, विविध उड्डाणपुलांचे बांधकाम, मनोर-वाडा-आसनगाव महामार्ग थेट समृद्धी महामार्गाला जोडणे तसेच रेल्वेच्या पूर्व-पश्चिमेस जोडणाऱ्या ओव्हर ब्रिजच्या कामांना तातडीने मंजुरी आणि नवघर (पूर्व) ते ससुनवार खाडीचे रुंदीकरण, खोलीकरण अशा कामांसाठी ही भेट घेण्यात आली. यावेळी नालासोपाऱ्याचे आमदार क्षितिज ठाकूर, आमदार राजेश पाटील, सनदी अधिकारी राध्येश्याम मोपलवार, भूषण गगराणी हे देखील या बैठकीला उपस्थित होते. वसई तालुक्यात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी २५ प्रकल्प राबवण्याची ठाकूर यांनी मागणी केली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित यंत्रणांना या प्रकरणात लक्ष घालून प्रकल्प



कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. सकारात्मक चर्चेनंतर मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीए, एमएसआरडीसी, एमएमबी आणि महारेल या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित संस्थांना उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. याबद्दल आमदार ठाकूर म्हणाले की, आम्ही आगामी पावसाळा लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांकडे आमच्या मागण्यांची यादी दिली आहे. वसई तालुक्यातील नागरिकांना एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत बिनदिक्कतपणे प्रवास करता येईल, या दृष्टीने हे सर्व प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. सरकारकडून आम्ही केलेल्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण झाल्या तर नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत उपयोगाचे ठरेल तसेच सरकारचेही सर्वांकडून कौतुक होईल. तर आमदार क्षितिज ठाकूर यांनी देखील मागण्यांकडे लक्ष दिल्याबद्दल आणि पायाभूत सुविधांच्या या प्रकल्पांना प्राधान्य दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. औद्योगिक हब अशी ओळख असलेल्या परिसरात पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी नवघर खाडीचे रुंदीकरण आणि खोलीकरणाचा प्रकल्प हा अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे ठाणे, भाईंदर आणि नायगावमध्ये प्रस्तावित असलेल्या रो-रो सेवेचाही मार्ग मोकळा होणार आहे.

---

लोकमत पान क्र. 7

# नोकऱ्यांच्या खासगीकरणाचा 'तो' निर्णय मविआ सरकारचाच

## असे सांगताच विरोधकांची विधानसभेत बोलतीच झाली बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शासकीय, निमशासकीय नोकरभरती बाह्य यंत्रणेच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीने करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधानसभेत जोरदार टीका केली खरी, पण हा निर्णय महाविकास आघाडी सरकारच्याच काळात झालेला होता, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांची बोलती बंद केली.

राज्याच्या उद्योग-ऊर्जा-कामगार विभागाने मंगळवारी काढलेल्या आदेशाचा संदर्भ देत अजित पवार म्हणाले की, अशा पद्धतीने नोकरभरती करून सरकार नोकऱ्यांचे खासगीकरण करत आहे. मुख्य सचिवांपेक्षाही जास्त म्हणजे ३ लाख ७८ हजार रुपये पगार देऊन प्रकल्प संचालकांसारखी पदे भरली जात आहेत. असे खासगीकरण केल्याने सरकारचे नियंत्रण राहणार नाही आणि गोपनीय माहिती बाहेर जाऊ शकेल. सरकारचा अंकुश राहणार नाही. त्यामुळे हा आदेश तत्काळ मागे घ्यावा. ज्येष्ठ सदस्य नाना पटोले आणि राष्ट्रवादीचे रोहित पवार यांनीही सरकारी नोकऱ्यांच्या खासगीकरणावर टीका केली.

त्यावर फडणवीस म्हणाले की, बाह्य स्रोतांद्वारे अशा पद्धतीने नोकरभरती करण्याचा निर्णय आघाडी सरकारनेच घेतला होता. निविदाही त्याच वेळी काढण्यात आली होती. त्यावेळी दोन आक्षेप होते. एक म्हणजे ईडीची कारवाई सुरू असलेल्या एका कंपनीचाही कंत्राट द्यावयाच्या कंपन्यांमध्ये समावेश होता. त्या कंपनीला आम्ही वगळले. तसेच असे कंत्राट पाच वर्षांच्या काळासाठीच देता येईल, असा नियम केंद्रीय दक्षता आयोगाने घालून दिलेला आहे. मविआ सरकारने दहा वर्षांसाठी ते देण्याचा निर्णय घेतला होता. तो बदलून आम्ही पाच वर्षांचा केलेला आहे. प्रकल्प संचालक दर्जाच्या अधिकाऱ्याला बाहेर खासगी कंपन्यांमध्ये पाच-पाच लाख रुपये पगार असतो. आपण निदान पावणेचार लाख रुपये पगार दिला तर ते येतील. ही पदे काही वर्षांसाठी भरली जातात. म्हणून तशी तरतूद केली आहे.

### विधानपरिषदेतही झाला गदारोळ

- विधानपरिषदेत २८९चा मुद्दा उपस्थित करीत कपिल पाटील यांनी नोकऱ्यांच्या खासगीकरणाचा विषय उपस्थित केला. सरकारचा हा निर्णय खासगी कंपन्यांना मोठे करण्यासाठी घेण्यात आला आहे. त्यांच्या किमान वेतनाची हमी कोण घेणार? सरकार आपली जबाबदारी झटकत असल्याची टीका त्यांनी केली. शशिकांत शिंदे, मनीषा कायंदे, भाई जगताप यांनीही हे खासगीकरण असल्याची टीका केली.
- यावर मंत्री गुलाबराव पाटील यांनी या विषयावर राजकारण न आणता विचार करायला हवा, असे सांगताना सहकारी साखर कारखाने, दूध संघ खासगीकरण कसे झाले, असा सवाल करीत विरोधकांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी प्रचंड गदारोळ झाला. या गदारोळातच हा २८९चा प्रस्ताव फेटाळत उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सरकारला यासंदर्भात निवेदन करण्याचे निर्देश दिले.

CamScanner

Scanned with CamScanner

दि.16/03/2023

पुण्यनगरी पान क्र.1

# संपकरी कर्मचाऱ्यांवर मेस्माचा बडगा

## संपाच्या दुसऱ्या दिवसापासून नोटिसा बजावण्यास सुरुवात




**मुंबई :** जुन्या पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीन सदस्यीय समितीची स्थापना करूनदेखील संपावर गेलेल्या कर्मचाऱ्यांनी भूमिकेवर कायम राहत दुसऱ्या दिवशीदेखील संप सुरूच ठेवला आहे. त्यामुळे अखेर प्रशासनाने संपावर गेलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांवर मेस्मा (अत्यावश्यक सेवा कायदा) अंतर्गत कारवाईला सुरुवात केली आहे. संपावर गेलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयातून नोटिसा पाठवायला सुरुवात झाली आहे. तसेच संपावर गेलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी कामावर हजर राहण्याच्या सूचना या नोटीसमधून देण्यात आल्या आहेत.

जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी राज्यभरातील सरकारी कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून संप सुरू केला आहे. तर पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीन सदस्यीय समितीची स्थापना करत असल्याचे जाहीर केले असून, संप मागे घेण्याचे आवाहन केले होते. मात्र असे असतानादेखील संपकरी निर्णय होईपर्यंत संप चालूच ठेवणार असल्याच्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळे अखेर प्रशासनाने संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. सरकारकडून सर्व अव्वल कारकून, सर्व महसूल सहाय्यक आणि सर्व शिपाई यांना पाठवलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी १४ मार्चपासूनच्या बेमुदत संपाबाबत शासनास ▸▸ पान ८ वर...

### संप मागे घ्या, शांतपणे मार्ग काढू – फडणवीस

जुन्या पेन्शन योजनेच्या विरोधात आम्ही नाही, मात्र पुन्हा ती स्वीकारायची असेल तर तिचे दायित्व किती ते पाहिल्याशिवाय त्याबाबत नव्याने निर्णय घेणे शक्य नाही. नव्या पेन्शननुसार जे कर्मचारी निवृत्त होतील ती वेळ २०३० मध्ये येईल. समिती नेमली आहे. आपण शांतपणाने विचार करून यावर मार्ग काढू, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. संप करणे वा पेपर न तपासणे अशा कृती कर्मचाऱ्यांनी करू नयेत असे म्हणत त्यांनी संपकरी कर्मचाऱ्यांना संप मागे घेण्याचे पुन्हा एकदा आवाहन केले. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण दोन दिवसांच्या चर्चेला बुधवारी फडणवीस यांनी विधानसभेत उत्तर दिले. ▸▸ पान ८ वर...

# संपकरी कर्मचाऱ्यांवर मेस्माचा बडगा

(पान १ वरून) नोटीस दिली आहे. या संपामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथील व अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचारी सहभागी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याद्वारे आपणास नोटीस दिली जाते की, या संपामध्ये भाग घेणे ही गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यात येईल. केंद्र सरकारचे 'काम नाही, वेतन नाही' हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे आपल्या निर्देशनास आणून देण्यात येत आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्यबुद्धीस अनुसरून कर्तव्यावर उपस्थित राहावे, असे या नोटीसमधून सांगण्यात आले आहे.

### संप मागे घ्या, शांतपणे मार्ग काढू – फडणवीस

(पान १ वरून) ते पुढे म्हणाले, नव्या पेन्शनचा जीआर २००५ मध्ये विलासराव देशमुखांच्या मुख्यमंत्री काळात व जयंत पाटील अर्थमंत्री होते तेव्हा काढला गेला. असे असले तरी हा तुमचा वा माझा प्रश्न नाही. पुढच्या काळात जी सरकारे राज्य करतील त्यांच्या अडचणी वाढवण्याचे काम आपण करू नये. मुख्यमंत्र्यांनी पेन्शनसंदर्भात सर्व विचार करण्यासाठी तीन माजी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची जी समिती नेमली आहे त्यांच्यापुढे कर्मचारी संघटनांनीही बाजू मांडावी, असे आवाहन त्यांनी केले. आपण शांतपणाने विचार करून मार्ग काढू. संप करणे वा पेपर न तपासणे अशा कृती कर्मचाऱ्यांनी करू नयेत, असेही ते म्हणाले.

लोकमत पान क्र.2

## महिलेची फसवणूक

**नालासोपारा :** अंबाडी रोडच्या सांई गार्डन सोसायटीत राहणाऱ्या इंद्रजित दिलबार कौर (५३) यांची ८ वर्षांत १ कोटी ४ लाखांची फसवणूक झाली आहे. आरोपी अतुल मेहता, महेश जावकर, अपर्णा जावकर, सुधीर पटोले, नीलेश यांनी म्हाडात कमी किमतीत घर देतो असे सांगून फसवणूक केली. माणिकपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 16/03/2023

पुढारी पृ.पान क्र. 1

# अमली पदार्थ विक्री; महिलेस अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या एका महिलेस तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली असून तिच्याकडून ९,३३,४०० रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केला आहे. साई श्रद्धा अपार्टमेंट, वर्धमान पार्कचे समोर विजयनगर नालासोपारा (पुर्व) येथील राहत्या घरात एक महिला गर्द मेफेड्रॉन या अंमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाला मिळाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सापळा रचून त्या ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी महिला गिता उदय स्वामी (५२) ही तिच्या राहत्या घरात अमली पदार्थाची विक्री करत असल्याचे दिसून आले. तिच्या घरात तपासणी केली असता ८८ ग्रॅम वजनाचा ८,८०,००० रुपये किमतीचा मेफेड्रॉन अंमली पदार्थ, १०.५६० ग्रॅम वजनाचा ५२,८०० रुपये किमतीचा गर्द (ब्राउन शुगर) हा अंमली पदार्थ तसेच ६०० रुपये रोख रक्कम असा एकूण ९,३३,४०० रुपये किमतीचे अमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. या महिलेविरुध्द तुळींज पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क २२ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी पान क्र.5

# प्रहार जनशक्तीचे रविवारी वसईत आंदोलन

**वसई :** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या भोंगळ कारभाराच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने रविवार दिनांक १९ मार्च रोजी विरार येथील महानगरपालिकेच्या मुख्यालयावर टाळेठोक आंदोलन करण्यात येणार आहे. वसई-विरार शहरातील सर्वसामान्य जनतेचे वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न, मूलभूत सोयीसुविधा, अपुरे आणि अनियमित पिण्याचे पाणी, खड्डेमय रस्ते, शहरात ठिकठिकाणी पसरत असलेले कचऱ्याचे साम्राज्य, दिव्यांगांसाठीच्या अपुऱ्या सोयी-सुविधा, स्वच्छतागृहाची कमतरता, निकृष्ठ दर्जाची परिवहन सेवा, भटक्या श्वानांच्या निर्बीजीकरणाबाबत उदासीनता, सलाईनवर असलेली आरोग्यव्यवस्था, घनकचरा व्यवस्थापनातील बोजवारा, खेळाची मैदाने, उद्यानांची दुरावस्था, अग्निसुरक्षेचा बोजवारा, टँकरमाफियांची दहशत, अल्पसंख्यांक मुस्लिम बांधवांचा दफनभूमीचा प्रश्न, पाणीवाटपातील भ्रष्टाचार, वसई-विरार शहरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेली अनधिकृत बांधकामे, आरक्षित जमिनीवर होत असलेले अतिक्रमणे, शहरात चुकीच्या पद्धतीने होत असलेली करआकारणी, आदिवासी पाड्यांची दुरवस्था, तरणतलावची दुरावस्था, फेरीवाला धोरणाबाबत उदासीनता या व इतर महत्वाच्या प्रश्नावर सातत्याने पत्रव्यवहार, निवेदने, बैठका घेऊनही अनेक प्रश्न सुटत नसल्यामुळे आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उदासीन भूमिकेविरोधात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने हे आंदोलन पुकारले असल्याचे सांगण्यात येत आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पान क्र.1

दि. 16/03/2023

# राज्यपालांच्या भूमिकेवर कोर्टाचे प्रश्नचिन्ह

## बहुमत सिद्ध करण्यास सांगण्याचा निर्णय कशाच्या आधारे घेतला? सरन्यायाधीशांची गंभीर टिप्पणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कुणा आमदारांच्या जिवाला धमकीचे पत्र मिळणे हे राज्य सरकारला बहुमत सिद्ध करण्यास सांगण्याचा आधार होऊ शकत नाही. राज्यपाल हे पवित्र शक्ती आहे. या शक्तीने अत्यंत गांभीर्याने काम करायला पाहिजे. राज्य सरकार उलथून टाकण्यात राज्यपालांची भूमिका राहू शकत नाही, अशा तीव्र शब्दांत सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी मत राज्याच्या सत्तासंघर्षाच्या सुनावणीवेळी बुधवारी व्यक्त केले.

राज्याच्या सत्तासंघर्षावर पाच सदस्यीय घटनापीठापुढे बुधवारी पुन्हा युक्तिवाद सुरू झाला. सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडण्याचा कसोशीने प्रयत्न केला; परंतु सरन्यायाधीशांच्या सरबत्तीला त्यांना सामोरे जावे लागले.

राज्यपाल हे संवैधानिक पद आहे, या पवित्र शक्तीने राजकारणापासून दूर राहायला पाहिजे. राज्यपालांनी स्वतःला प्रश्न विचारण्याची आवश्यकता आहे, असेही सरन्यायाधीश म्हणाले. तुषार मेहता राज्यपालांची भूमिका कशी योग्य होती हे सांगण्याचा प्रयत्न करीत होते; परंतु सरन्यायाधीशांनी आज राज्यपालांच्या भूमिकेवर थेट प्रश्नचिन्ह उभे केले.



सत्तासंघर्ष

### एका रात्रीत लग्न कसे मोडले?

- शिवसेनेच्या आमदारांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाबद्दल असंतोष होता, असाही मुद्दा मेहता यांनी मांडला. यावर सरन्यायाधीश म्हणाले, गेली अडीच वर्षे सुखाने यांचा संसार सुरु होता. अचानकपणे एका रात्रीत असे काय घडले आणि हे लग्न मोडले?
- राज्यपालांनी स्वतःलाच प्रश्न विचारला पाहिजे की, आपण ३ वर्षे काय करीत होतात? एका दिवसात असे काय घडले? काही लोक सरकारची कोंडी करतात. मग राज्यपाल आघाडीतील लोकांना विश्वासमत सिद्ध करण्यास सांगतात. लोकशाहीत हे पाहणे अतिशय क्लेशकारक आहे.

### राजभवनाने यात सहभागी व्हायला नको होते

**१** ठाकरे सरकारला बहुमत सिद्ध करण्यास सांगण्याचा निर्णय राज्यपालांनी कशाच्या आधारावर घेतला, अशी विचारणा सरन्यायाधीशांनी केली. यावर मेहता म्हणाले, यासाठी शिवसेनेच्या ३४ आमदार, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचे पत्र होते. तसेच शिंदे गटाच्या आमदारांना जिवाला धोका असल्याचे पत्र होते.

**२** यावर सरन्यायाधीश म्हणाले, एवढाच आधार होता ना? कुणाच्या जिवाला धोका आहे, हा बहुमत चाचणीचा आधार होऊ शकत नाही. बहुमत सिद्ध करायला सांगणे हे सरकार कोसळण्याचे संकेत आहेत. यात राजभवनाने सहभागी व्हायला नको होते. आम्ही राज्यपालांच्या अधिकाराबद्दल बोलत आहोत. हे खूपच गंभीर आहे, असेही मत सरन्यायाधीश यांनी नोंदविले.

### महाराष्ट्र सुसंस्कृत राज्य

- महाराष्ट्र हे अत्यंत सुसंस्कृत आहे. इथे या प्रकारची राजकीय घटना होणे हे योग्य नाही, असेही मत त्यांनी एकदा नोंदविले.
- तुषार मेहता यांनी एकनाथ शिंदे यांना सभागृहाचा नेता असल्याने राज्यपालांनी सरकार स्थापनेला पाचारण केले होते, असा युक्तिवाद करताना सांगितले की, सर्व आमदारांनी शिंदे यांची २०१९ मध्ये विधिमंडळाचे गटनेता म्हणून निवड केली होती.
- विधिमंडळात गटनेत्यांच्या अधिकाराला अधिक प्राधान्य असते. २१ जून २०२२ रोजी शिंदे यांना गटनेतेपदावरुन काढण्याची ठाकरे यांची कृती ही बेकायदेशीर आहे.
- विधिमंडळातील बहुसंख्य सदस्यांनी बैठक करुन शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला व तेच सभागृहाचे नेते राहतील, असे पत्र विधानसभा अध्यक्ष व राज्यपालांना दिले.

[ राज्य सरकार उलथून टाकण्यात राज्यपालांची भूमिका राहू शकत नाही. ]



### आमदारांच्या जिवाला धोका कसा?

तुषार मेहता यांच्या युक्तिवादानंतर कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. सिब्बल म्हणाले, सरकारच्या वतीने आमदारांच्या जिवाला कोणताही धोका नसल्याचे पत्र सर्वोच्च न्यायालयाला सादर केल्याचे सांगितले. सरकारनेच कोणताही धोका नसल्याचे सांगितल्यानंतर जिवाला धोका असल्याचा दावाच शिल्लक राहत नाही.

### तुलना आयाराम-गयारामांशी

यावेळी युक्तिवाद करताना कपिल सिब्बल यांनी शिंदे गटाच्या आमदारांची तुलना आयाराम-गयाराम अशी केली. निवडून आलेल्या आमदाराला स्वतःची कोणतीही ओळख नसते. तो पक्षाचा आमदार म्हणूनच निवडणूक लढवितो व पक्षाचा आमदार म्हणून त्यांची निवडणूक आयोगाकडे नोंदणी होते, असेही त्यांनी सांगितले.

### ३४ सदस्य अपात्र होतील?

पक्षांतर बंदीच्या कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे ३४ सदस्य अपात्र घोषित होतील काय? असा प्रश्न न्या. पी. एस. नरसिंहा यांनी विचारला. यावर सिब्बल म्हणाले, निश्चितच: राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचीनुसार अपात्र होतील.

### ..तर आयोगाकडे कशासाठी?

शिंदे गटाचे नेते आम्ही शिवसेना आहोत, असा युक्तिवाद करीत आहेत. यावर कपिल सिब्बल म्हणाले, शिंदे गट जर शिवसेना आहे, तर निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी कशासाठी गेले? यामुळे प्रत्येक वेळी शिंदे गटाने आपली भूमिका बदलली आहे. आपल्या सोयीनुसार त्यांनी युक्तिवाद केला. यात सर्वोच्च न्यायालयाने जे अंतरिम स्थगनादेश दिले, यामुळे ठाकरे सरकार कोसळण्यात मोठी भूमिका असल्याचे सिब्बल यांनी यावेळी सांगितले.

CS CamScanner

Scanned with CamScanner

मुल्य ₹ 5.00

सुविचार

उन पर ध्यान मत दीजिए जो आपकी पीठ पीछे बात करते हैं, इसका सीधा सा अर्थ है कि आप उनसे दो कदम आगे हैं।

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, गुरुवार, 16 मार्च 2023

निष्पक्ष नज़र, निष्पक्ष ख़बर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

अंदर पढ़ें

# लाखों की ड्रग्स के साथ महिला गिरफ्तार

**दबंग रिपोर्टर » वसई**

मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत तुलिंज थाने की क्राइम डिटेक्शन की टीम



ने 14 मार्च को नालासोपारा पूर्व के विजयनगर क्षेत्र से रेड कर लाखों रुपये ड्रग्स बरामद किया है। फिलहाल,परिमंडल 2 डीसीपी सुहास बावचे व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में तुलिंज थाने के पी.आई शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने बुधवार को दी है। पुलिस ने बताया कि, पुलिस को गुप्त सूचना मिली कि विजय नगर, नालासोपारा पूर्व इलाके में गीता स्वामी (52) नामक महिला ड्रग्स की तस्करी करती है,जिसके बाद पुलिस ने उसके घर (साई श्रद्धा बिल्डिंग) पर छापा मारा तो उसके पास भारी मात्रा में ड्रग्स बरामद की गई। पुलिस के मुताबिक, महिला के पास से 10.560 ग्राम ब्राउन शुगर व 88 ग्राम एमडी बरामद की गई है, जिसकी कीमत 9 लाख 33 हजार रुपये आकी गयी है। पी.आई शैलेन्द्र नगरकर ने कहा कि उक्त महिला नशीला पदार्थ बेचने का काम करती है और इसके पहले भी उसके खिलाफ तुलिंज थाना में मामला दर्ज किया गया था,उक्त अपराध में जमानत मिलने के बाद आरोपी महिला के कब्जे से यह दूसरी ड्रग्स बिक्री के लिए बरामद हुई,महिला को गिरफ्तार किया गया है,उसके खिलाफ तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। आगे की तहकीकात पुलिस कर रही है।ज्ञात हो कि, इसके पहले भी तुलिंज पुलिस ने नालासोपारा पूर्व प्रगति नगर क्षेत्र एक नाईजीरियन के पास 58 लाख 74 हजार रुपये की भारी मात्रा में ड्रग्स की एक बड़ी खेप जप्त की थी।

Scanned with CamScanner

लोकमत

# पहाटे फिरवतो तो चावी म्हणून मिळते पाणी!

## पाण्याचा दुरुपयोग टाळण्यासाठी खबरदारी

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शहरातील घरोघरी पाणीपुरवठ्याची जबाबदारी वसई-विरार महानगरपालिकेची आहे. पण प्रत्यक्षात पाणी पोहोचवण्याचे काम व्हॉल्वमनशिवाय शक्य नाही. भल्या पहाटे व्हॉल्व्हमनने चावी फिरवली तरच पाणी मिळू शकते. हा व्हॉल्व्हमन नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच पाण्याचा दुरुपयोग होणार नाही, याचीही खबरदारी घेतो.

वेळेत व्हॉल्व्ह उघडणे व वेळेत बंद करणे ही जबाबदारी २७० ते २८० व्हॉल्व्हमन ३६५ दिवस पार पाडतात. या व्हॉल्व्हमनला कधीच सुट्टी नसते. १२ ते १५ हजारांत १२ तास आठवड्याची सुट्टी न घेता पाणीपुरवठ्याचे काम करणारा हा व्हॉल्व्हमन मात्र अजूनही दुर्लक्षित आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते कंत्राट पद्धतीने काम करत आहेत. आकृतिबंधामध्ये वसई-विरार मनपात ७ व्हॉल्व्हमॅनला कायमस्वरूपी सेवेत घेण्याची तरतूद आहे.



### शहरात पाणी सोडणारे २७० ते २८० व्हॉल्व्हमन

वसई-विरार महापालिका हद्दीत पाणीपुरवठा करण्यासाठी ७३ पाण्याच्या टाक्या आहेत. मनपाच्या ९ प्रभागांत या टाक्या आहेत. या टाक्यांतून घरोघरी पाणी पोहोचवण्यासाठी २७० ते २८० व्हॉल्व्हमन कार्यरत असल्याची माहिती मनपा अधिकाऱ्यांनी दिली आहे. शहरात जवळपास अंदाजे ५१ हजार नळजोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

### पहाटे ४ वाजता सुरू होतो दिवस

शहरात महापालिकेतर्फे होणार पाणीपुरवठा विशिष्ट वेळेत होतो. बहुतांश वस्त्यांमध्ये सकाळी पाणीपुरवठा केला जातो, तर काही वस्त्यांमध्ये सायंकाळी पाणीपुरवठा होतो. त्यामुळे सकाळी पाणीपुरवठा होणाऱ्या वस्त्यांमध्ये व्हॉल्व्हमनला पहाटे चार वाजल्यापासून चावी फिरवायला निघावे लागते. मनपाच्या ७३ टाक्यांमधून ५० ते ५५ हजार ग्राहकांना पाणीपुरवठा होतो.

### एका प्रभागात २ ते ३ जण सोडतात पाणी

मनपाच्या ७३ टाक्यांमधून ५० ते ५५ हजार ग्राहकांना पाणीपुरवठा होतो. मनपात ज्या प्रभागात ग्राहक जास्त आहेत, तेथे २-३ व्हॉल्व्हमॅनवर पाणी सोडण्याची जबाबदारी असते. प्रत्येक प्रभागातील वस्त्यांमध्ये विशिष्ट ठिकाणी लावलेले असतात. हे व्हॉल्व्ह सुरू करण्याची व बंद करण्याची जबाबदारी व्हॉल्व्हमनची असते. एका प्रभागात २ ते ३ व्हॉल्व्हमन आहेत.

### महापालिकेने कायम करावे

हे सर्व व्हॉल्व्हमन कंत्राट पद्धतीने नियुक्त केले आहेत. त्यांची १२ तासांची ड्युटी असते. ३६५ दिवस त्यांना काम करावे लागते. व्हॉल्व्ह उघडणे व बंद करणे त्याचबरोबर त्यांना टाकीच्या फ्लो मीटरवर नियंत्रण ठेवावे लागते. १२ हजारांवर काम करणाऱ्या व्हॉल्व्हमनला पालिकेने कायम करावे, अशी मागणी होत आहे. पण, नोकरी जाण्याच्या भीतीने कोणीही थेट बोलायला तयार नाही.

Hello Vasai
Page No. 2 Mar 16, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# अमली पदार्थ विकणारी महिला अखेर गजाआड

## नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विजय नगर परिसरात अमली पदार्थ विकणाऱ्या महिलेला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांनी मंगळवारी रात्री पकडले आहे. पोलिसांनी लाखो रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून आरोपी महिलेला अटक केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी सपोनि विशाल धायगुडे यांनी दिली आहे.

हवालदार उमेश वरठा यांना साई श्रद्धा अपार्टमेंटच्या राहत्या घरात गीता उदय स्वामी (५२) ही महिला गर्द, मेफेड्रॉनची विक्री करीत असल्याचे कळले. छाप्यात ८ लाख ८० हजारांचा मेफेड्रॉन, ५२ हजार ८०० रुपये किमतीची ब्राउन शुगर व रोख रक्कम असा ९ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कामगिरी पोलिस



उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव व तुळींजचे वरिष्ठ निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक मिथुन म्हात्रे, उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल, सहायक उपनिरीक्षक शिवानंद सुतनासे, हवालदार नागरे, आनंद मोरे, आशपाक जमादार, केंद्रे, खेमनार, छबरीबन, राऊत, महिला पोलिस हवालदार मेहेर यांनी केली आहे.

Mumbai Main
Page No. 4 Mar 16, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक ००२ | गुरुवार १६ मार्च २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# नालासोपाऱ्यात ड्रग्जची खेप जप्त, आरोपी अटक

**वसई.** मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणाऱ्या तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने नालासोपारा पूर्वेकडील विजयनगर परिसरात १४ मार्च रोजी छापा टाकून लाखो रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले होते. सध्या परिमंडळ २ चे डीसीपी सुहास बावचे, एसीपी चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे पीआय शैलेंद्र नगरकर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शोध पथकाने ही कारवाई केली आहे. अशी माहिती पोलीस अधिका-यांनी बुधवारी दिली.गुन्हेगार गुप्तहेर मिळाल्यावर नालासोपारा पूर्व भागातील विजय नगरमध्ये गीता स्वामी (५२) नावाची महिला अमली पदार्थांची विक्री करते. त्यानंतर पोलिसांनी तिच्या घरावर (साई श्रद्धा बिल्डिंग) छापा टाकला आणि तिच्याकडून मोठ्या प्रमाणात



ड्रग्ज जप्त केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेकडून १०.५६० ग्रॅम ब्राऊन शुगर आणि ८८ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले असून, त्याची किंमत ९ लाख ३३ हजार रुपये एवढी आहे.पीआय शैलेंद्र नगरकर यांनी सांगितले की, ही महिला अंमली पदार्थ विकण्याचे काम करते आणि यापूर्वीही त्याच्या विरोधात तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, या गुन्ह्यात जामीन मिळाल्यानंतर आरोपी महिलेच्या ताब्यातून हे दुसरे अंमली पदार्थ विक्रीसाठी जप्त करण्यात आले, महिलेला अटक करण्यात आली, तिच्यावर एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत. यापूर्वीही तुळींज पोलिसांनी नालासोपारा पूर्व प्रगतीनगर परिसरात नायजेरियन नागरिकाकडून ५८ लाख ७४ हजार रुपयांची अमली पदार्थांची मोठी खेप जप्त केली होती.

Scanned with CamScanner